।।जय जय रघुवीर समर्थ।।

परिचय - स्वाध्याय २

दशक ३, समास २ ते ५

स्वगुण परीक्षा

हे चार समास म्हणजे सामान्य माणसाची कहाणी सांगितली आहे. ही गोष्ट आपली आहे, शेजारी राहणाऱ्या माणसाची आहे थोडक्यात सर्वांची आहे.

जन्मापासून ते वृद्धावस्थेपर्यंत होणारे बदल,घटना, नातेसंबंध याचे यथार्थ वर्णन श्रीसमर्थ करतात. या सर्व घटना होण्यामागचे प्रमुख कारण आपल्याला असलेले स्वस्वरूपाचे अज्ञान!

हे अज्ञान जन्माला येण्यापूर्वी नसते. आईच्या गर्भात जीवास हे ज्ञान असते व त्याची अनुभूती नसते. गर्भात असताना " देवा मला येथून सोडव, बाहेर पडल्यावर मी माझे स्वहित करीन " अशी प्रार्थना तो जीव करतो.

गर्भी म्हणे सोहं सोहं।

बाहेरी पडता म्हणे कोहं।

ऐसा कष्टी जाला बहु।

गर्भवासी ।। ३-१-४७

परंतु जन्म झाल्याझाल्या , मायेच्या प्रांतात आल्यामुळे स्वस्वरूप विसरायला होते व शोध सुरू होतो स्वतःचा!

हा शोध सुरू झाल्यावर आपल्याला काय शोधायचे आहे हे तो जीव पूर्णपणे विसरून जातो आणि या संसारात म्हणजे भवसागरात रममाण होतो. याची कथा फार उत्तम रीतीने श्रीसमर्थ या चार समासांमध्ये कथन करतात. हा कथाभाग आजही लागू आहे. तशाच घटना आपल्या भोवती घडत असतात.

दशक ३-२ मध्ये बाल्यावस्था ते पहिला विवाह यामधील मनुष्याचे वागणे,विचार, भावना अतिशय उत्तमप्रकारे मांडल्या आहेत. वाचताना असे वाटते की जणू काही आपलाच जीवनपट मांडला आहे.

तान्ह्या बाळाचे विचार मग थोडे मोठे झाल्यावर त्या लहान बाळाचे वागणे, आई बद्धल विशेष प्रेम, आई म्हणजेच दैवत ही भावना, नंतर बालपण, आजारपण, आईवडिलांचे या आजारपणामुळे कासावीस होणे, मग मित्रपरिवार त्यानंतर शिक्षण मग लग्न! विवाह झाल्यावर पत्नीविषयीची शारीरिक ओढ, तिच्यासाठी वेडे होणे, त्यावेळी जगात फक्त मी आणि माझी पत्नी याशिवाय दुसरे अन्य मला कोणीच नको ही तरुण्यावस्था! याचे वर्णन श्रीसमर्थ करतात. बाल्यावस्थेत असताना जर मातेचे अकाली निधन झाले तर त्या मुलाची होणारी अवस्था वाचून अस्वस्थ व्हायला होते. नवीन नवीन लग्न झाल्यावर आईवडील नकोसे होतात, पत्नी आणि सासर रया मुलास आवडू लागते , कारण सासरी मुलास मान मिळत असतो. त्यावेळी सर्वात भाग्यवान मीच अशी धारणा असते. या गोड स्वप्नांत असताना अचानक पहिली पत्नी जग सोडून जाते. त्यामुळे येणारे स्मशानवैराग्य याचे वर्णन केले आहे.

दशक ३-३ मध्ये पहिली पत्नी निधन पावल्यामुळे वेडापिसा होणारा माणूस दुसऱ्या विवाहास तयार होतो, याचे वर्णन आहे. दुसरा विवाह झाल्यावर गंभीर आजारपण येते. त्यातून तो बरा होतो. मग संतान व्हावे म्हणून प्रयत्न करतो. होत नाही म्हणून दुःखी होतो, नवस बोलतो. त्या सर्व नवसांची यादी या समासात दिली आहे. मग मनोकामना पूर्ण होते. मुले होतात.

दशक ३-४ या समासाची सुरवातच होते ती पुढील ओवीने ---

लेकुरे उदंड जाली।

तो ते लक्ष्मी निघोन गेली।

बापडी भिकेस लागली।

काही खाया मिळेना।। ३-४-१

या ठिकाणी कुटुंब नियोजन किती महत्वाचे आहे हे श्रीसमर्थ सांगतात. कुटुंब मोठे असल्यामुळे येणाऱ्या अडचणी श्रीसमर्थ येथे सांगतात. मोठे कुटुंब असल्यामुळे भागत नाही. पैसा पुरत नाही. मग पैसा मिळवण्यासाठी तो परदेश गमन करतो. खूप द्रव्य मिळतो. पुन्हा आपल्या घरी परततो. सर्वजण आनंदी होतात. कारण याने संपत्ती आणलेली असते. त्यामुळे सर्वाना तो हवाहवासा होतो. तो सुद्धा आनंदी होतो. याला वाटते मी आल्यामुळे सर्वजण आनंदी झाले आहेत. पण हा गैरसमज लवकरच दूर होतो.या सर्वांना मी नको आहे, माझा पैसा हवा आहे याची जाणीव त्याला होते. तसाच तो परत परदेशी जाण्यास निघतो. त्यावेळी आता जगात नसलेली त्याची आई त्याला आठवते. री किती प्रेमळ होती, तिला मी हवा होतो, माझा पैसा नव्हे याची जाणीव होते, पण आता खूप उशीर झालेला असतो. याचे वर्णन पुढील ओवीत श्रीसमर्थ करतात --

ते समई माता आठवली

म्हणे धन्य धन्य माऊली

मजकारणे बहुत कष्टली।

परी मी नेणेची मूर्ख।। ३-४-३५

खूप दुःखी होतो पण तसेच घर सोडतो. आरुण्यरुदन करतो पण आता वेळ गेलेली असते.

दशक ३-५ मध्ये पुढील दारुण अवस्था मग होणारा पश्चात्ताप याचे वर्णन आहे. तो परदेशी जाऊन परत संपत्ती आणतो पण त्यावेळी दुष्काळ पडतो. त्यात त्याची द्वितीय पत्नी मृत्यू पावते तसेच काही मुलेसुद्धा निधन पावतात मग पुन्हा आक्रोश व दुःख. पुन्हा लोकांच्या आग्रहामुळे तिसरे लग्न! मग सावत्र भावाभावांचे भांडण! याला त्यांच्याकडून मारहाण! मग गाव मधे पडते व सलोखा घडवून आणते. याला व याच्या तृतीय पत्नीला गावाबाहेर झोपडी बांधून देतात. ते दोघे तिथे राहतात. हा वृद्ध आणि पत्नी तरुण! परचक्र येते, त्यात तिला पळवून नेतात. मग पुन्हा आक्रोश! पण आता वृद्ध झाल्यामुळे काहीच करू शकत नाही. इथे त्याला देव आठवतो.

द्रव्य नाही कांता नाही।

ठाव नाही शक्ती नाही।

देवा मज कोणीच नाही।

तुजवेगळे।। ३-५-३४

या नंतर श्रीसमर्थांनी वृद्धावस्थेचे सत्य पण तितकेच दारुण, अंगावर काटा आणणारे वर्णन केले आहे. यातील वर्णनानुसार आपण वृद्ध माणसे पाहिली असतील, पहात असाल. मग आपली अवस्था वृद्धपणी काय होणार आहे? विचार करायला भाग पडतो. ओवी ३६ ते ५१ वाचल्यावर मन विशन्न, उदास होते.

हे सर्व सांगितल्यावर सत्य काय हे श्रीसमर्थ सांगतात ----

जन्म अवघा दुःखमूळ।

लागती दुःखाचे इंगळ।

म्हणोनिया तत्काळ।

स्वहित करावे ।। ३-५-५२

आपण या अवस्थेतून जाणार आहोत. माहीत असते तरीसुद्धा उपासना करत नाही. या संसारात अडकून पडतो, नव्हे ते अडकणे आपल्याला आवडते. स्वहित याचा अर्थच समजत नाही. वासना कमीच होत नाहीत, हे हवे ते हवे असे सुरूच रहाते. आपण ईश्वराच्या पाशी रमतच नाही. यासाठी श्रीसमर्थ कळकळीने सांगतात " आता तरी जागे व्हा, स्वहित करवून घ्या "

अशी शिकवण देणारा हा गंभीर समास संपतो.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।